# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि – ४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)**

**(महाविद्यालयीन विभाग)**

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२-२१६५९४ E-Mail – arcllegesectiongug48@gmail.com

**(डॉ.एस.एम.रोकडे)**
**संचालक (प्रभारी)**


**क्र./गो.वि./महा.वि/5095 /२०१६**
**दिनांक 17 /०२/२०१६**
**अंत्यंत महत्वाचे/**
**तातडीने**

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
संलग्नीत सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- दिनांक २७ फेब्रुवारी, मराठी भाषा दिन साजरा करण्याबाबत.**
संदर्भ :- मा. मंत्री महोदय श्री. विनोद तावडे यांचे पत्र दिनांक ११/०२/२०१६ रोजीचे

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्याचे मा. शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकिय शिक्षण मराठी भाषा व सांस्कृतिक मंत्री महोदय श्री. विनोद तावडे यांचे पत्रान्वये दिनांक २७ फेब्रुवारी, **"मराठी भाषा दिन"** साजरा करण्याबाबत कळविलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक २७ फेब्रवारी, २०१६ रोजी संलग्नीत पत्रान्वये कार्यवाही करुन अहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा, हि विनंती.

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक(प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सहपत्रे- वरिलप्रमाणे**

प्रतिलीपी- १. मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव समादाराने सादर.
२. मा. सहसंचालक(उ.शि), नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव समादाराने सादर.

**विनोद तावडे**
मंत्री

शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण
मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : **११.०२.२०१६**

**विषय : दिनांक २७ फेब्रुवारी, मराठी भाषा दिन साजरा करण्याबाबत.**

सस्नेह नमस्कार,

दिनांक २७ फेब्रुवारी, २०१६ रोजी मराठी भाषा दिन संपन्न होत आहे. ज्यांनी भाषेचे समाज जीवनातील वर्म ओळखले आणि ज्यांनी मराठी भाषेचे मर्म जाणले अशा ज्ञानपीठ विजेत्या कविवर्य कुसुमाग्रज यांचा हा जन्मदिन, आपण सर्व कृतज्ञतापूर्वक मराठी भाषेचा गौरव दिन म्हणून साजरा करीत असतो.

श्रेष्ठ कवी आणि भाषातज्ज्ञ कुसुमाग्रजांचे स्मरण म्हणून हा दिवस औचित्यपूर्ण आहेच, त्याचबरोबर मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाला पूरक आणि प्रेरणादायी ठरतील, अशा उपक्रमांसाठीही हा दिवस महत्त्वाचा आहे. म्हणूनच मराठी भाषा दिन हा व्यापक स्तरावर, वैविध्यपूर्ण रीतीने, भव्य दिव्यतेसह आणि मुख्य म्हणजे पुरेशा गांभीर्यासह साजरा व्हावा, अशी आमची भूमिका आहे. त्या अनुषंगाने जागोजागी भाषा विकासाचा विचार पेरणारे बहुआयामी कार्यक्रम योजले जाणे अपेक्षित आहे.

२७ फेब्रुवारीचे औचित्य साधून आपल्या संस्थेमध्ये सुयोग्य कार्यक्रमाचे आयोजन आपण करावे, असे आवाहन या पत्राद्वारे आम्ही करत आहोत. मराठी साहित्यविषयक कार्यक्रमांबरोबरच भाषा विकासाच्या इतर महत्त्वाच्या आयामांचाही विचार आपण करावा. कार्यक्रमाचे आयोजन करताना मातृभाषा आणि शिक्षण, मराठीच्या बोली, मराठी भाषेचा इतिहास, भाषाविज्ञान, वर्णमाला, मराठीतील समृद्ध कोशवाङ्:मय आणि अनुवादित व बालसाहित्य या विषयांचा विचार होणे आवश्यक आहे. तसेच मराठीचा सर्वांगीण वापर (शासन-प्रशासनातील, न्याय व्यवहारातील व अशासकीय कार्यालयांतील वापर), माहिती तंत्रज्ञानातील व महाजालावरील मराठी आणि भाषाविकासातील सर्वांचा सहभाग याही महत्त्वाच्या मुद्यांचा प्रसार होणे अत्यावश्यक आहे. या पत्रासोबत तपशीलवार उपक्रम सूची पाठवत आहोत, याची नोंद घ्यावी. यापैकी एक किंवा अनेक कार्यक्रम आपण योजू शकता. विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, ग्रंथालये, सामाजिक व सांस्कृतिक संस्था यांनी मराठी भाषा दिनाचे यथोचित कार्यक्रम योजण्यात पुढाकार घ्यावा. कार्यक्रमाचे आयोजन करताना शैक्षणिक संकुलांच्या परिसरात इतर पाठ्यक्रमांच्या परीक्षा कालावधीत परीक्षार्थींना त्रास होणार नाही, याची दक्षता आयोजकांनी घ्यावी.

महाराष्ट्रासह जगभरातील सुमारे १५ कोटी लोकांची मातृभाषा असलेली आपली मराठी भाषा नव्या युगाची आव्हाने पेलण्यास समर्थ आहेच. मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने विविध दर्जेदार कार्यक्रम-उपक्रमांचे आयोजन करून आपण आपल्या माय-मराठीला आणखी समृध्द आणि समर्थ करू या!

दिनांक २७ फेब्रुवारी रोजी आपण भाषा विकासाला पूरक आणि प्रेरक अशा दिमाखदार आणि गंभीर कार्यक्रमांचे आयोजन कराल, या अपेक्षेसह आपणा सर्वांना मराठी भाषा दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

**सहपत्र : तपशीलवार उपक्रम सूची.**

आपला,

(विनोद तावडे)

कार्यालयीन पत्ता : १०८, पहिला मजला, विस्तारित इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
टेलि/फॅक्स क्रमांक : ०२२-२२०२ ९७४२/२२०२ ७१७४ (का.), ०२२-२२८७ ११७०/२२८७ ३५७२ (नि.), ई-मेल : *ministervinodtawde@gmail.com*

# दिनांक २७ फेब्रुवारी, २०१६ : मराठी भाषा दिन — उपक्रम सूची

१. मराठी भाषेसंबंधित विषयांवर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे. तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखती. तसेच साहित्यिक, भाषातज्ज्ञ, भाषा चळवळीतील कार्यकर्ते यांच्या सन्मान सोहळ्यांचे आयोजन.

२. न्यायव्यवहार, शासन-प्रशासन, प्रसारमाध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा मराठी भाषेचा वापर याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन.

३. मातृभाषेची महती आणि माहिती, तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर विचारमंथनात्मक कार्यक्रमांचे आयोजन.

४. युनिकोडप्रणित मराठी आणि इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.

५. समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे.

६. कुसुमाग्रज व इतर सुप्रसिद्ध थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन.

७. मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन.

८. मराठीतील कोश वाङ्‌मयाबाबत माहितीपर व्याख्याने किंवा सादरीकरणे. तसेच, कोश कसे वाचावेत, याबाबत प्रशिक्षण.

९. बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन. (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.)

१०. शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती यांबाबतच्या स्पर्धा.

११. म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती — या विषयांवर रंजक व्याख्याने / सादरीकरणे.

१२. मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन.

१३. मराठी कविता, प्रसिद्ध उतारे, मराठीसंबंधित घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन.

१४. मोडी लिपी चे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन

१५. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी अत्युच्च त्यागासह कार्य करणाऱ्या अभ्यासक कार्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या संस्थाना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

१६. इयत्ता १० वी व इ.१२ वी च्या परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार. तसेच मराठी विषयात पदवी आणि पदव्युत्तर पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या सत्काराचे आयोजन.

---

टीप : आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल vinodtawdeminister@gmail.com या इ-पत्त्यावर किंवा पत्रात नमूद कार्यालयीन पत्त्यावर जरुर पाठवावा.




महाराष्ट्र शासन

# मराठी भाषा विभाग
## राज्य मराठी विकास संस्था व
## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

सप्रेम नमस्कार,
२७ फेब्रुवारी, 'मराठी भाषा गौरव दिन' आणि
ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कविवर्य 'कुसुमाग्रज' यांचा जन्मदिन.
या निमित्ताने मराठी भाषेच्या गौरवार्थ आणि भाषा विकासासाठी
कार्यरत असणाऱ्या मान्यवरांच्या सन्मानार्थ

**श्री.पु.भागवत स्मृती उत्कृष्ट प्रकाशन पुरस्कार २०१५**
**विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार २०१५**
**मंगेश पाडगांवकर भाषा संवर्धक पुरस्कार (पहिला)**
**डॉ. अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार (पहिला)**
आणि उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठीचे
**'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०१४' प्रदान सोहळा**
संपन्न होणार आहे.

आपण अवश्य या !

प्रमुख उपस्थिती
**मा.देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

विनीत
**मा.विनोद तावडे**
मा. मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण,
उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा,
आणि सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य

**श्री. भूषण गगराणी,** भाप्रसे
प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग

---

या प्रसंगी
मराठी भाषेची स्थित्यंतरे उलगडणारा
**'मराठीनामा'**
हा प्रथितयश कलाकारांचा दृकश्राव्य कार्यक्रम
सादर केला जाणार आहे.



---

**कार्यक्रमाचे स्थळ व वेळ :**
**शनिवार, दि. २७ फेब्रुवारी २०१६**
**रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई.**
**सायं.५.३० ते रा.८.३०**